## निशाणी ६६ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा विनोद गवाजी कुलकर्णी (भुसंपादन अर्ज क्र.२४२/२०१३ मधील जाबदार क्र.४) यांनी त्यांचे भारतीय स्टेट बँक, दशमेश नगर शाखा, छत्रपती संभाजीनगर मधील खाते क्र.२०१२८१९५६५४ अनफ्रिज करण्यासाठी केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

३. अभिलेखानुसार या न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षकांनी सदर बँकेला १६.०७.२०२४ रोजी पत्र पाठवुन सदर खात्याबाबत स्थीतीची माहिती मागविली असता बँकेने त्यावर रु.६०,००,०००/– रक्कम होल्डवर असल्याचे नमुद करुन कळविले आहे. अर्जदाराचे वि. वकिल समक्ष उपस्थीत असुन त्यांचे म्हणणे असे की, सदर प्रकरणातील तडजोडीमध्ये त्यांना रु.७,६२,००५/– एवढीच रक्कम मिळालेली आहे. अभिलेखानुसार अन्य पक्षकारांना त्यांच्या रक्कमा आपापलया खात्यात मिळाल्या असल्याचे अहवाल या प्रकरणी दाखल झाल्याचे व त्याबाबत सदर बँकेकडे या न्यायालयाचे कार्यालयाद्वारा याच प्रकारचे कार्यवाहीसाठी पत्रव्यवहार (नि.१३, १५, १७, २०, २१, २६ ते ३३) झाल्याचे तपशिलवार दिसुन येते. अर्जदाराचे वि. वकिलांचे म्हणणे असे की, सदर बँक खाते पुर्वी फ्रिज करण्यात आले होते व नंतर त्याच खात्यात मावेजा रक्कम जमा झाल्यामुळे ती जमा करुनसुध्दा अर्जदार यांना प्रत्यक्षात मिळु शकलेली नाही.

४. त्याबाबत सदर प्रकरणातील अभिलेख, मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे प्रस्तुत प्रकरणात मध्यस्थीद्वारे झालेल्या तडजोडीच्या समझोतानाम्याची प्रमाणित प्रत (नि.५५) व मध्यस्थी अहवाल यांचे एकत्रीत

अवलोकन केले असता सदर प्रकरण तडजोडीने मिटल्याचे दिसुन आले, तर उपरोक्त नमुद तपशिलानुसार अन्य पक्षकारांना मावेजा रक्कमा देण्याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदर परिस्थीतीत अर्जदार विनोद गवाजी कुलकर्णी यांना प्रस्तुत प्रकरणामध्ये मिळालेल्या मावेजा रक्कम रु.७,६२,००५/- रकमेपुर्ते सदर खाते अनफ्रिज करणेचे तसेच सदर बँकेकडुन प्रस्तुत खाते स्टेटमेंटची प्रत मागविणेचे ०१.०८.२०२४ रोजीचे आदेशानुसार निर्देशित केले होते. संबंधित बँकेकडुन त्यानुसार ०५.०४.२०२४ ते २५.०६.२०२४ चे खाते उता-याची प्रत प्राप्त झाल्याचे नमुद करुन अर्जदार यांनी ती दाखल केली आहे. त्या खाते उता-यात २५.०६.२०२४ अखेर रु.७,६४,०७३/- जमा असल्याचे नमुद आढळते. परंतु त्या उता-यावर असे सुध्दा हस्तलिखित नमुद आढळते की 'As per your order dt.01.08.2024 to unfrezz of Rs.7,62,005.00 but Hold amount Rs.60,00,000/- If hold Rs.60,00,000 removed then customer able to withdraw amount Rs.7,62,005 due to Hold amount is greater than balance available.' परंतु, सदर प्रकरणाच्या अभिलेखामध्ये सदर खाते रु.६०,००,०००/- रकमेपर्यंत फ्रिज केल्याचा आदेश आढळुन आला नाही. माझ्या मते, त्या आदेशाची बँक म्हणते ती प्रत बँकेकडुनच मागविणे उचित होईल व तद्नंतर पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

Digitally signed by JADHAV KIRAN SAHEBRAO
Date: 2024.08.03 17:38:49 +0400

(के. एस. जाधव)

दि.०३/०८/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.M. Shaikh |
| Name of the Court | : | Jt. CJSD Court, Aurangabad. |
| Order date | : | 03.08.2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 03.08.2024 |
| Order uploaded on | : | 03.08.2024 |